# किनारी नियंत्रण क्षेत्र अधिसूचना २०११ आणि द्वीपक्षेत्र संरक्षण अधिसूचना २०११ बाबत नेहमी विचारले जाणारे प्रश्न

I. सामान्य

१. किनारी नियंत्रण क्षेत्र अधिसूचना २०११ ची आवश्यकता काय आहे?

किनारी पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करण्याच्या हेतूने सर्वसमावेशक उपाययोजनांसाठी केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाने पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ अंतर्गत १९.०२.१९९१ रोजी किनारी नियंत्रण क्षेत्र अधिसूचना जारी केली होती. तथापि, गेली दोन दशके १९९१ च्या अध्यादेशाची अंमलबजावणी करीत असताना खालील मुद्दे प्रकर्षाने पुढे आले.

- देशाच्या मुख्य भूभागाचा ५५०० किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा तसेच अंदमान-निकोबर आणि लक्षद्वीप बेटांची २००० किलोमीटर लांबीची किनारपट्टी या संपूर्ण क्षेत्रासाठी १९९१ च्या अधिसूचनेत समान नियमावली नमूद करण्यात आली आहे; मात्र या संपूर्ण किनारी प्रदेशात जैवविविधता, जलशक्तीचा प्रभाव आणि गतिविषयक परिस्थिती, लोकवस्तीचा आकृतिबंध, नैसर्गिक स्रोत, भूरचनाशास्त्रीयदृष्ट्या आणि त्यातील बदलांच्या दृष्टीनेही प्रचंड वैविध्य आहे.
- १९९१ च्या अधिसूचनेत सीआरझेड परवान्यासाठी स्पष्ट प्रक्रिया विदीत करण्यात आली नव्हती; तसेच त्यासाठीची कालमर्यादाही नमूद करण्यात आली नव्हती. त्याचप्रमाणे, परवान्यासाठी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेचे स्वरूपही देण्यात आले नव्हते.
- परवाना मिळाल्यानंतरची देखरेख यंत्रणा किंवा नियमांचे उल्लंघन होत असल्यास नियमांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेबाबत १९९१ मध्ये स्पष्ट तरतूद नव्हती, हेही ध्यानात घेतले पाहिजे.
- भरती-ओहोटी रेषेदरम्यान आणि भरतीरेषेपासून जमिनीच्या दिशेला ५०० मीटर अंतरात होणाऱ्या विकासात्मक कामांवर नियंत्रण ठेवण्याचा हेतू १९९१ ची अधिसूचना जारी करण्यामागे होता. परंतु जमिनीवरील चलनवलनामुळे निर्माण होणारे प्रदूषण नियंत्रित करण्यासंदर्भात १९९१ च्या अधिसूचनेत ठोस पावले उचलली गेली नव्हती.
- अनेक निर्बंध लादणाऱ्या १९९१ च्या अधिसूचनेमुळे पर्यावरणशास्त्रीयदृष्ट्या संवेदनशील अशा काही किनारी प्रदेशांमध्ये राहणाऱ्या व्यक्ती आणि जनसमुदायांसमोर अनेक अडचणी

उभ्या राहिल्या. अशा समुदायांमध्ये मुंबईतील किनारी प्रदेशात मोडकळीस आलेल्या आणि धोकादायक इमारतींमध्ये राहणारे नागरिक आणि झोपडपट्टीवासीय, केरळमधील खाड्यांच्या क्षेत्रात असणाऱया बेटांवरील रहिवासी, गोवा तसेच अन्य ठिकाणच्या पारंपरिक अधिवासात राहणाऱया समुदायांचा समावेश आहे.

- विविध राज्य सरकारे, केंद्रीय विभाग, स्वयंसेवी संस्था आदींनी वारंवार केलेल्या विनंत्यांमुळे १९९१ च्या अधिसूचनेत जवळजवळ २५ वेळा दुरुस्त्या कराव्या लागल्या. शिवाय अधिसूचनेतील विशिष्ट तरतुदींबद्दल खुलासा करणारे अनेक कार्यालयीन आदेश केंद्रीय पर्यावरण आणि मंत्रालयाला काढावे लागले. १९९१ च्या अधिसूचनेत वेळोवेळी केलेले बदल २०११ च्या अधिसूचनेत समाविष्ट करण्यात आले आहेत.

उपरोक्त सर्व मुद्दे २०११ च्या अधिसूचनेत सर्वसमावेशक दृष्टिकोन ठेवून विचारात घेतले गेले आहेत आणि हाताळले गेले आहेत. किनारी नियमावलीसंदर्भात डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली स्थापलेल्या समितीचा 'फायनल फ्रंटियर' हा अहवाल, तसेच सर्व किनारी राज्यांची सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासन यांच्याशी वेळोवेळी झालेल्या विचारविनिमयाचा आधार घेण्यात आला आहे. गोवा, चेन्नई, पुरी, कोची आणि मुंबईत झालेल्या या विस्तृत चर्चासत्रांच्या अध्यक्षस्थानी राज्यमंत्री होते.

२. किनारी नियमन क्षेत्र अधिसूचना, २०११ ची उद्दिष्टे कोणती?

किनारी नियंत्रण क्षेत्र अधिसूचना, २०११ ची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

- किनारी क्षेत्रात राहणारे मच्छिमार आणि अन्य जनसमूहांना उपजीविकेची सुरक्षा प्रदान करणे.
- किनारपट्ट्यांचे संरक्षण आणि संवर्धन करणे, आणि
- किनारी क्षेत्रातील नैसर्गिक धोके आणि जागतिक तापमानवाढीमुळे वाढणारी समुद्रपातळी यांचा विचार करून शास्त्रीय तत्त्वांच्या आधारे किनारी क्षेत्रात शाश्वत विकासास प्रोत्साहन देणे.

II. २०११ च्या अधिसूचनेअंतर्गत किनारी नियंत्रण क्षेत्राची ओळख आणि वर्गीकरण

१. २०११ च्या अधिसूचनेअंतर्गत किनारी क्षेत्राचे वर्गीकरण कसे करण्यात आले आहे?

१९९१ च्या अधिसूचनेद्वारे किनारी नियंत्रण क्षेत्राचे वर्गीकरण सीआरझेड-I (पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील), सीआरझेड-II (बांधीव क्षेत्र), सीआरझेड-III (ग्रामीण क्षेत्र) आणि सीआरझेड-IV (जलक्षेत्र) असे करण्यात आले होते. २०११ च्या अधिसूचनेत हे वर्गीकरण कायम ठेवण्यात आले आहे. केवळ सीआरझेड-IV मध्ये बदल करण्यात आला असून, प्रादेशिक जलक्षेत्र आणि भरतीप्रभावित जलक्षेत्राचा अंतर्भाव त्यात करण्यात आला आहे.

अंदमान आणि निकोबार, तसेच लक्ष्यद्वीप बेटांचे पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ अंतर्गत संरक्षण करण्याच्या दृष्टीने द्वीपक्षेत्र संरक्षण अधिसूचनेच्या मसुद्याचा अंतर्भाव या अधिसूचनेत प्रथमच करण्यात आला आहे.

२. सीआरझेड-I वर्गात अंतर्भूत होण्यास पात्र असलेले किनारी प्रदेश कोणते?

सीआरझेड-I वर्गात समाविष्ट होणाऱ्या किनारी प्रदेशांची स्पष्ट यादी सीआरझेड अधिसूचना, २०११ मध्ये देण्यात आली आहे. ती पुढीलप्रमाणे :

(i) किनाऱ्यांचे अखंडत्व राखण्यात मूलभूत भूमिका बजावणारे, पर्यावरणीयदृष्ट्या आणि भूरचनाशास्त्रीयदृष्ट्या संवेदनशील लक्षणे असणारे भूभाग.

- जलपर्णींचे क्षेत्र, १००० चौरस मीटरपेक्षा अधिक भागात जलपर्णी असल्यास ५० मीटरचे झालर क्षेत्र उपलब्ध करून देता येईल;
- प्रवाळ, प्रवाळांचे खडक आणि तद्संबंधीची जैवविविधता;
- वाळूच्या टेकड्या;
- जैविकदृष्ट्या क्रियाशील असलेले दलदलीचे क्षेत्र;
- राष्ट्रीय उद्याने, सागरी उद्याने, वन्यजीवांची आश्रयस्थाने, राखीव वनक्षेत्रे, वन्यजीवांचे अधिवास आणि वन्यजीव (संरक्षण) कायदा, १९७२ (५३), वने (संवर्धन) कायदा, १९८० (६९) आणि पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ (२९) अन्वये संरक्षित स्थळे (वातावरणाच्या प्रस्तरासह);
- खारपड क्षेत्रे;
- कासवांच्या विणीचे प्रदेश;
- हॉर्स शू खेकड्यांचे अधिवास;
- सागरी गवताचे प्रदेश;

- पक्ष्यांच्या विणीची ठिकाणे;
- पुरातत्त्वदृष्ट्या महत्त्वाची स्थळे आणि वारसास्थळे;

(ii) भरतीरेषा आणि ओहोटीरेषा यांमधील प्रदेश.

३. सीआरझेड-I क्षेत्रात परवानगी असलेले उद्योग कोणते?

१९९१ च्या अधिसूचनेनुसार सीआरझेड-I मध्ये परवानगी असलेले उद्योग आणि त्यांमध्ये वेळोवेळी केलेल्या बदलांचा समावेश २०११ च्या अधिसूचनेत करण्यात आला आहे. या तरतुदी पुढीलप्रमाणे :

(i) पुढील प्रकल्पांव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी सीआरझेड-I मध्ये नवीन बांधकामांना परवानगी देण्यात येणार नाही.

- अणुऊर्जा विभागाशी संबंधित प्रकल्प;
- वाहिन्या, वहनयंत्रणा (प्रेषण वाहिन्यांसह);
- सीआरझेड-I मध्ये परवानगी असलेल्या उद्योगांना आवश्यक असलेल्या सुविधा;
- भारतीय हवामान खात्याद्वारा वादळाच्या हालचाली टिपणाऱ्या आणि अंदाज वर्तविणाऱ्या रडारची उभारणी;
- लाटांची गती बाधित होणार नाही, अशा रीतीने खांबांवर उभारल्या जाणाऱ्या, बंदरांना जोडणाऱ्या रस्त्यांची भरतीरेषा आणि ओहोटीरेषेदरम्यान निर्मिती;
- केवळ नवी मुंबईमध्ये आधीच मंजूर झालेल्या हरितक्षेत्र विमानतळाची निर्मिती;

(ii) पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील नसलेल्या भरतीरेषा आणि ओहोटीरेषेदरम्यानच्या प्रदेशात खालील बाबींना परवानगी असेल;

- नैसर्गिक वायू शोधणे आणि मिळविणे;
- किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या परवानगीने स्थानिक जनसमूहांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असणारी रुग्णालये, शाळा, पावसापासून संरक्षणासाठी सार्वजनिक निवारे, सार्वजनिक स्वच्छतागृहे, पूल, रस्ते, धक्के, पाणीपुरवठा, सांडपाणी वहनयंत्रणा, मैलावहन यंत्रणा आदींची उभारणी;
- सौरऊर्जेच्या साहृयाने समुद्राच्या पाण्यापासून मिठाचे उत्पादन करणे;
- खारे पाणी गोडे करण्याचे प्रकल्प;

- अधिसूचित गोदींमध्ये खाद्यतेले, खते, अन्नधान्य आदी घातक नसलेल्या पदार्थांची साठवणूक;
- लाटांची गती बाधित होणार नाही, अशा रीतीने खांबांवर उभारल्या जाणाऱ्या, बंदरांना जोडणाऱ्या रस्त्यांची भरतीरेषा आणि ओहोटीरेषेदरम्यान निर्मिती.

४. सीआरझेड-II वर्गात समाविष्ट होणारे किनारी प्रदेश कोणते?

किनाऱ्यापर्यंत किंवा किनाऱ्यालगत विकसित झालेले, नगरपालिका क्षेत्रातील प्रदेश अशी सीआरझेड-II मधील प्रदेशांची व्याख्या या अधिसूचनेने केली आहे.

५. सीआरझेड-II वर्गातील प्रदेशात परवानगी असलेल्या कृती कोणत्या?

अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या, अधिकृत बांधकामांच्या किंवा धोकारेषेच्या जमिनीकडील बाजूस बांधकामांना परवानगी मिळू शकेल. खारे पाणी गोडे करण्याचे प्रकल्प, धोकादायक नसलेल्या पदार्थांची साठवणूक अशा कृतींनाही परवानगी असेल. सीआरझेड अधिसूचना, २०११ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बांधकामांसाठी १९.२.१९९१ चा चटईक्षेत्र निर्देशांक आणि चटईक्षेत्र गुणोत्तर असेल आणि त्याचा वापर मुख्यत्वे झोपडपट्टी पुनर्वसन आणि धोकादायक इमारतींच्या फेरविकासासाठी करण्यात येईल.

६. सीआरझेड-III वर्गात समाविष्ट केलेले किनारी प्रदेश कोणते? या वर्गातील क्षेत्रात कोणत्या गोष्टी परवानगीस पात्र आहेत?

तुलनात्मकदृष्ट्या कमी बाधित झालेले किनारी प्रदेश, तसेच फारसे विकसित न झालेले ग्रामीण आणि शहरी किनारी प्रदेश सीआरझेड-III वर्गात समाविष्ट करण्यात आले आहेत.

सीआरझेड-III मध्ये परवानगीस पात्र असलेल्या कृतींची जी यादी १९९१ च्या अधिसूचनेत देण्यात आली आहे, तीच या अधिसूचनेत कायम ठेवण्यात आली आहे. भरतीरेषेच्या ० ते २०० मीटरचा प्रदेश 'ना-विकास क्षेत्र' असेल आणि या क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्याची परवानगी नसेल. शेती, बागायती, चराऊ कुरण, उद्याने, क्रीडांगणे, वनक्षेत्र, अणुऊर्जा विभागाचे प्रकल्प, दुर्मिळ खनिजांचे उत्खनन, समुद्राच्या पाण्यापासून मिठाचे उत्पादन, पेट्रोलियम उत्पादनांची आणि द्रवरूप वायूची आवक, साठवणूक आणि पुनर्भरण, अपारंपरिक ऊर्जास्रोतांपासून वीजनिर्मिती आणि काही सार्वजनिक सुविधा आदी कामांना या क्षेत्रात परवानगी देता येईल.

भरतीरेषेपासून २०० ते ५०० मीटरदरम्यान स्थानिक जनसमूहांच्या घरांची बांधणी आणि दुरुस्ती, नवी मुंबईच्या हरितक्षेत्र विमानतळासह पर्यटनविषयक अन्य प्रकल्प, पेट्रोलियम उत्पादनांची आणि द्रवरूप वायूची आवक, साठवणूक आणि पुनर्भरण, धोकादायक नसलेल्या पदार्थांची साठवणूक, खाऱ्या पाण्यापासून गोडे पाणी तयार करण्याचे प्रकल्प आणि अपारंपरिक ऊर्जास्रोतांपासून वीजनिर्मिती या प्रकल्पांना परवानगी देता येईल.

७. सीआरझेड-IV वर्गात समाविष्ट होण्यास पात्र ठरणारे किनारी प्रदेश कोणते?

ओहोटीरेषेपासून भूप्रदेशाच्या हद्दीपर्यंतच्या प्रदेशाचे वर्गीकरण सीआरझेड-IV मध्ये करण्यात आले आहे. भरतीप्रभावित जलसंस्थांचा समावेशही या प्रवर्गात करण्यात आला आहे.

८. सीआरझेड-IV प्रवर्गात परवानगीस पात्र असलेल्या कृती कोणत्या?

स्थानिक जनसमुदायांकडून करण्यात येणारी पारंपरिक मच्छिमारी आणि तदनुषंगिक कृतींना सीआरझेड-IV प्रवर्गात अटकाव करण्यात येणार नाही. तथापि, प्रक्रिया न केलेला मैला, सांडपाणी किंवा घनकचरा या क्षेत्रात उत्सर्जित करण्यास वा सोडण्यास मनाई असेल. किनाऱ्यालगतच्या शहरांमधील मैल्यावर प्रक्रिया करण्यासाठीचा सर्वसमावेशक आराखडा ही अधिसूचना जारी झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत तयार करणे आणि दोन वर्षांच्या आत त्याची अमलबजावणी होणे बंधनकारक आहे.

III. मच्छिमार जनसमूहांसाठी विशेष तरतुदी

१. मच्छिमारीवर अवलंबून असलेल्या स्थानिक जनसमूहांसाठी २०११ च्या अधिसूचनेत कोणत्या नव्या तरतुदींचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

मच्छिमार जनसमूह किनारी प्रदेशाचे पारंपरिक रहिवासी असल्याने सीआरझेड अधिसूचना २०११ चे प्रारूप तयार करताना त्यांना अग्रक्रमाने महत्त्व देण्यात आले आहे.

या अधिसूचनेच्या घोषित उद्दिष्टांपैकी एक म्हणजे, "किनारी प्रदेशात राहणाऱ्या मच्छिमार आणि अन्य स्थानिक जनसमूहांना उपजीविकेची सुरक्षा प्रदान करणे... तसेच नैसर्गिक धोके आणि जागतिक तापमानवाढीमुळे समुद्राची वाढती पातळी हे घटक विचारात घेऊन शाश्वत मार्गाने विकासाला प्रोत्साहन देणे."

मच्छिमार जनसमूहांच्या समस्यांशी निगडीत असलेल्या खालील तरतुदी २०११ च्या अधिसूचनेत करण्यात आल्या आहेत.

(i) बारा सागरी मैलांचा प्रदेश, तसेच भरतीप्रभावित जलसंस्थांचा समावेश सागरी नियंत्रण क्षेत्रात करण्यात आला आहे. त्याचे प्रयोजन पुढीलप्रमाणे :

- प्रक्रिया न केलेला मैला आणि सांडपाण्याच्या उत्सर्जनावर नियंत्रण आणणे, घनकचऱ्याच्या उत्सर्जनावर नियंत्रण आणणे आणि मासे व त्यांची पर्यावरणीय परिसंस्था यांना धोक्यात आणणाऱ्या इतर सर्व गोष्टींवर निर्बंध घालणे;
- प्रवाळ आणि प्रवाळाचे खडक, जलचरांची आश्रयस्थाने, तेथील राखीव बाह्य वातावरण आणि सागरी वाफे यांसारख्या मासे व इतर जलचरांची अंडी उबविण्यासाठी, वाढविण्यासाठी आणि जलचरांची जोपासना करण्यासाठी उपयुक्त असणाऱ्या ठिकाणांचे संवर्धन व संरक्षण करणे;
- सागरी प्रदेश आणि किनारपट्टीतील पाणी उपसा, वाळूचा उपसा, जहाजातील सांडपाण्याचा निकास, सागरी प्रवाहात भिंती तसेच पाणी वळविणारे कोणतेही बांधकाम, समुद्र हटविण्याचे काम आदी मच्छिमारीवर गंभीर परिणाम करणाऱ्या कामांवर नियंत्रण आणणे;
- वातावरणातील बदलांमुळे सागरी आणि किनारी पाण्याच्या पातळीत होणारे बदल आणि मच्छिमार समूहांच्या जीविताचे आणि मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या नैसर्गिक आपत्तींच्या अभ्यासास मदत करणे;

या क्षेत्रात **पारंपरिक पद्धतीने मच्छिमारी किंवा तदनुषंगिक कोणत्याही कृतींना अटकाव करण्यात आलेला नाही**, हे येथे उल्लेखनीय आहे.

(ii) देशातील अनेक किनारपट्ट्यांवर मानवनिर्मित कारणांमुळे होणारी धूप मच्छिमारांच्या झोपड्यांना धोका उत्पन्न करीत आहे. अतिधूप होणारे किनारे, मध्यम धूप होणारे किनारे आणि सुस्थिर किनारे अशा गटांत किनाऱ्यांची वर्गवारी आणि सीमांची निश्चिती केल्यानंतर धूप होण्यास कारणीभूत ठरणाऱ्या मानवी कृती नियंत्रित केल्या जातील.

(iii) किनारी क्षेत्र व्यवस्थापन आराखडा तयार करताना मच्छिमार जनसमूहांसाठी आवश्यक पायाभूत सुविधांचे स्पष्ट आरक्षण केले पाहिजे. तसेच जलसंस्थांमधील मच्छिमारीचे क्षेत्र आणि मत्स्यबीज उत्पादन क्षेत्र स्पष्टपणे आरेखित केले पाहिजे.

(iv) २०११ च्या अधिसूचनेनुसार, किनारी क्षेत्र व्यवस्थापन आराखड्याच्या प्रारूपावर सर्व संबंधित घटकांची मते मागविणे किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणांवर बंधनकारक होणार आहे. त्यामुळे किनारी क्षेत्र व्यवस्थापन आराखडा बनवताना मच्छिमार समूहांसह स्थानिक जनसमूहांना मते मांडण्याचा अधिकार प्रथमच प्राप्त होणार आहे.

(v) सीआरझेड-III क्षेत्रात स्थानिक मच्छिमार जनसमूहांसाठी पायाभूत सुविधा उभारण्यास या अधिसूचनेद्वारे परवानगी देण्यात आली आहे.

(vi) स्थानिक शहरी आणि ग्रामीण नियोजन नियमावलीला अधीन राहून स्थानिक मच्छिमार जनसमूहांच्या घरांची दुरुस्ती आणि फेरबांधणी करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

(vii) सीआरझेड-III क्षेत्रात भरतीरेषेपासून शून्य ते २०० मीटरचे क्षेत्र हे ना-विकास क्षेत्र (एनडीझेड) घोषित करण्यात आले आहे; मात्र मच्छिमार जनसमूहांसह किनारपट्टीवरील पारंपरिक रहिवाशांच्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने अशा भागात हे क्षेत्र १०० मीटरने कमी करण्यात आले आहे, ज्यायोगे राज्य शासन आणि केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाच्या परवानगीने अशा जनसमूहांना घरांची बांधकामे समुद्रमुखापासून १०० ते २०० मीटरच्या पट्ट्यात करणे शक्य होणार आहे.

२. काही विशिष्ट राज्यांच्या क्षेत्रात स्थानिक मच्छिमारांसाठी कोणत्या खास तरतुदी २०११ च्या अधिसूचनेत करण्यात आल्या आहेत?

महाराष्ट्र, गोवा, केरळ, सुंदरबन यांसह पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील अशा किनारपट्ट्यांवर राहणाऱया मच्छिमार समुदायांसाठी काही विशेष तरतुदीही २०११ च्या अधिसूचनेत समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

- बृहन्मुंबई : मच्छिमार समूहांच्या पारंपरिक वस्त्यांसाठी (कोळीवाडे) विशेष तरतूद करण्यात आली आहे, ज्यायोगे संबंधित क्षेत्राचे आरेखन करून ते सीआरझेड-III मध्ये समाविष्ट करण्यात येईल आणि स्थानिक शहरी किंवा ग्रामीण विकास आराखड्यानुसार तेथे बांधकाम आणि फेरबांधकामांसह विकासकामे हाती घेता येतील.

- गोवा : गोव्याच्या किनारपट्टीलगतची गावे आणि तेथील समुदायांना मच्छिमारी आणि तदनुषंगिक बाबींसाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांचे सर्वेक्षण गोवा सरकार करेल. १९९१ च्या अधिसूचनेनुसार, अधिकाऱ्यांकडून आवश्यक परवाना घेतल्याशिवाय सीआरझेड क्षेत्रात स्थानिक जनसमूहांच्या घरांची फेरबांधणी/ विस्तार करणे हा अधिसूचनेचा भंग ठरविण्यात आला होता. अशी बांधकामे (सुमारे ५०००) अवैध ठरवून पाडण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले होते. तथापि, स्थानिक नागरिकांच्या घरांची दुरुस्ती आणि फेरबांधणी २०११ च्या अधिसूचनेद्वारे परवानाप्राप्त ठरविण्यात आली आहे.
- केरळ : केरळमधील सीआरझेड क्षेत्र भरतीरेषेपासून (एचटीएल) जमिनीच्या दिशेने ५० मीटरने घटविण्यात आले आहे. हे ‘ना-विकास क्षेत्र’ असून, यात बांधकामांना परवानगी नाही. तथापि, या क्षेत्रातील स्थानिकांच्या घरांची दुरुस्ती किंवा फेरबांधणी आता करता येईल. मासेमारीचे धक्के, मासे वाळविण्याच्या जागा, पारंपरिक पद्धतीने मत्स्यप्रक्रिया करणारी केंद्रे, नौकादुरुस्ती, बर्फनिर्मितीचे उद्योग आदी किनारी सुविधांची कामेही शून्य ते ५० मीटर क्षेत्रात करता येतील. भरतीरेषेपासून जमिनीकडे ५० मीटरपेक्षा जास्त अंतरावर असलेल्या घरांची दुरुस्ती आणि फेरबांधणी स्थानिक ग्रामपंचायतींच्या परवानगीने करता येईल.
- सुंदरबन : सुंदरबन आणि पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील अशा अन्य विभागांमधील विकासाचे नियमन करण्याच्या दृष्टीने, तसेच या विभागाचे संरक्षण आणि संवर्धन करून स्थानिकांचे हितरक्षण करण्याच्या दृष्टीने त्यांच्याशी चर्चा करून एकात्म विकास आराखडा (आयएमपी) तयार करण्याची गरज आहे. मच्छिमारांसह सर्व स्थानिक जनसमूहांच्या रहिवासाची गरज असा एकात्म विकास आराखडा तयार करताना विचारात घेणे गरजेचे आहे.

IV. प्रदूषण नियंत्रणासाठीच्या उपाययोजना

१. किनारपट्टीवरील भूप्रदेशाच्या/पाण्याच्या प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी २०११ च्या अधिसूचनेत कोणत्या तरतुदी करण्यात आल्या आहेत?

किनारपट्टीचा भूप्रदेश/पाण्याच्या प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी योजावयाच्या उपाययोजनांची यादी २०११ च्या अधिसूचनेत देण्यात आली आहे. कचरा आणि घातक पदार्थांचे किनारी पाण्यात

उत्सर्जन करणे ही प्रतिबंधित कृती ठरविण्यात आली आहे. सर्व किनारी राज्यांनी पुढील खबरदारी घ्यावयाची आहे.

- प्रक्रिया न केलेले सांडपाणी आणि घातक पदार्थ समुद्राच्या पाण्यात सोडण्याची सध्याची पद्धत ही अधिसूचना जारी झाल्यापासून दोन वर्षांच्या आत बंद करण्यात येईल.
- अधिसूचना जारी झाल्यापासून एक वर्षाच्या आत घनकचरा समुद्राच्या पाण्यात सोडणे पूर्णपणे बंद केले जाईल.
- किनारी प्रदेश आणि पाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी कालबद्ध रीतीने कृती आराखडा तयार केला जाईल.
- कृती आराखडा केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाकडे पाठविला जाईल. केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालय या आराखड्याच्या अमलबजावणीसाठी तांत्रिक आणि आर्थिक मदत देईल.

V. परवाना पद्धत

१. २०११ च्या अधिसूचनेअंतर्गत परवाना प्राप्त करण्याची कोणती पद्धत विदीत केली आहे?

सीआरझेड परवाना प्राप्त करण्याची प्रक्रिया १९९१ च्या अधिसूचनेत अंतर्भूत करण्यात आली नव्हती; मात्र २०११ च्या अधिसूचनेनुसार अशा प्रकारचा परवाना प्राप्त करण्याची प्रक्रिया पुढीलप्रमाणे देण्यात आली आहे.

(i) प्रकल्प अधिकारयांनी संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाकडे खालील कागदपत्रे आणि परवाने जोडून विनंती अर्ज करावा

- नमुना १ (अधिसूचनेतील परिशिष्ट-IV);
- पर्यावरणीय प्रभाव निर्धारण अहवाल (ईआयए). यात भूपर्यावरणीय आणि जलपर्यावरणीय प्रभाव निर्धारण अहवालांचा समावेश असावा. तसेच केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आवश्यक असलेला बंदर आणि किनारी प्रदेशाचा एकत्रित अभ्यास अहवाल;
- आपत्ती व्यवस्थापन अहवाल आणि धोका व्यवस्थापन अहवाल;
- अधिकृत यंत्रणेने रेखांकित केलेल्या भरतीरेषा आणि ओहोटीरेषेसह किनारी नियंत्रण क्षेत्राचा नकाशा (१:४००० प्रमाणात);

- उपरोक्त नकाशावर रेखांकित केलेला प्रकल्पाचा आराखडा;
- प्रकल्पाच्या सात किलोमीटर त्रिज्येतील प्रदेश सीआरझेड नकाशात स्पष्टपणे दिसायला हवा;
- सीआरझेड नकाशात सीआरझेड I, II, III आणि IV वर्गात येणारे प्रदेश दर्शविण्यात आलेले असावेत;
- प्रकल्पातील सांडपाणी, घनकचरा, मैला इत्यादींची नोंद घेऊन संबंधित प्रदूषण नियंत्रण मंडळाने अथवा समित्यांनी प्रकल्पाला दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र (किनारी क्षेत्रातील प्रदूषण कमी करण्याच्या उद्देशाने प्रदूषण नियंत्रण मंडळ अथवा समित्यांनी दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आले आहे.)

(ii) संबंधित किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाने वरील कागदपत्रे प्राप्त झाल्यापासून साठ दिवसांच्या आत किनारी क्षेत्र व्यवस्थापन आराखडा आणि सीआरझेड अधिसूचनेनुसार कागदपत्रांची तपासणी करून पुढील अस्थापनांना शिफारशी सादर कराव्यात.

- प्रकल्प पर्यावरणीय प्रभाव निर्धारण अधिसूचना २००६ च्या कक्षेत येत असल्यास एसईएसी किंवा ईएसी;
- प्रकल्प सीआरझेड अधिसूचनेच्या कक्षेत येत असल्यास केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालय;

(iii) संबंधित किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अहवालावर विचार करून संबंधित प्रकल्पाबाबत केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालय किंवा राज्य शासन साठ दिवसांत निर्णय घेईल.

२. हा परवाना किती दिवस वैध राहील?

२०११ च्या अधिसूचनेनुसार प्रकल्पाला देण्यात आलेला परवाना, तो दिल्यापासून पाच वर्षे वैध राहील.

३. परवाना दिल्यानंतरची देखरेख यंत्रणा कशी असेल?

एखाद्या प्रकल्पाला २०११ च्या अधिसूचनेनुसार एकदा परवानगी दिली, की खालील देखरेख यंत्रणा सदर प्रकल्पाला लागू होईल.

- पर्यावरणीय परवाना प्राप्त करतेवेळी घालून दिलेल्या अटी व नियमांचा अनुपालन अहवाल संबंधित प्रकल्प व्यवस्थापनाने दर सहा महिन्यांनी (हार्ड आणि सॉफ्ट कॉपी) संबंधित नियंत्रण प्राधिकरणाला पाठविला पाहिजे. कॅलेंडर वर्षानुसार हा अहवाल दरवर्षी १ जून आणि ३१ डिसेंबर रोजी सादर झाला पाहिजे;
- सादर केलेला असा अनुपालन अहवाल हा सार्वजनिक दस्तावेज असला पाहिजे;
- संबंधित नियंत्रण प्राधिकरणाकडे अर्ज केल्यास या अहवालाची प्रत कोणालाही मिळाली पाहिजे;
- संबंधित नियंत्रण प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर ताजा अनुपालन अहवाल प्रदर्शित केला गेला पाहिजे आणि तो प्रकल्पाला मंजुरी मिळाल्यापासून पाच वर्षांपर्यंत वैध असला पाहिजे.

VI. अमलबजावणीसाठी उपाययोजना

१. अमलबजावणीसाठी कोणती यंत्रणा २०११ च्या अधिसूचनेत सुचविण्यात आली आहे?

अमलबजावणी यंत्रणेचा समावेश १९९१ च्या अधिसूचनेत करण्यात आला नव्हता. ही या अधिसूचनेतील एक मोठी त्रुटी होती, तसेच मोठ्या प्रमाणावर अधिसूचनेचा भंग होण्याचे ते महत्त्वाचे कारणही होते. अधिसूचनेचा भंग केल्यास कोणती कारवाई करायची त्याची पद्धत आणि कालबद्धता सीआरझेड अधिसूचना २०११ मध्ये विहित करण्यात आली आहे. केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाकडून या अधिसूचनेच्या प्रभावी अमलबजावणीसाठी राज्य पातळीवर किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणे आणि राष्ट्रीय स्तरावर केंद्रीय किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण कालबद्ध रीतीने अधिक सक्षम बनविण्यात येईल आणि त्यांच्या अधिकारकक्षेत वाढ केली जाईल. ताजे नकाशे, उपग्रहावरून घेतलेली छायाचित्रे आणि माहिती-तंत्रज्ञानाचा वापर करून नियमभंगाच्या घटना २०११ ची अधिसूचना जारी झाल्यापासून चार महिन्यांच्या अवधीत शोधून काढल्या जातील आणि त्यापुढील चार महिन्यांत दोषींवर पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अन्वये योग्य ती कारवाई केली जाईल.

२. पारदर्शकतेच्या हमीसाठी अन्य कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत?

किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या कारभारात पारदर्शकता येण्यासाठी किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाला स्वतःचे संकेतस्थळ सुरू करावे लागेल आणि त्यावर धोरणे, इतिवृत्ते, घेतलेले निर्णय, परवानापत्रे, नियमभंगाच्या घटना, केलेली कारवाई, न्यायप्रविष्ट प्रकरणे आदींबरोबरच किनारी क्षेत्र व्यवस्थापन आराखड्याची माहिती सादर करावी लागेल. (१९९१ च्या अधिसूचनेत अशा प्रकारच्या तरतुदी करण्यात आल्या नव्हत्या.)

VII. विशिष्ट किनारपट्ट्यांसाठी विशेष तरतुदी

१. विशेषत्वाने दखल घेण्याजोगे किनारी प्रदेश कोणते?

- पर्यावरणीय विविधता, सामाजिक-आर्थिक परिस्थिती, विकासकामांचा दबाव आदी बाबींमधील फरक विचारात न घेता १९९१ च्या सीआरझेड अधिसूचनेत देशभरातील संपूर्ण किनारपट्टीसाठी समान नियम तयार केले होते. २०११ च्या अधिसूचनेत मात्र झोपडपट्टीत राहणारे लोक, मुंबईतील जुन्या आणि धोकादायक इमारतींमध्ये राहणारे लोक, केरळमधील खाड्यांच्या क्षेत्रात असलेल्या बेटांवरील रहिवासी, गोव्याच्या किनारपट्टीवर राहणारे स्थानिक जनसमूह, सुंदरबनसारख्या पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील विभागात राहणारे लोक आदींचा स्वतंत्र विचार करून विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत.

२. बृहन्मुंबईला देण्यात आलेल्या विशेष सवलती कोणत्या?

मुंबईला सामना कराव्या लागणाऱ्या विशिष्ट पर्यावरणीय आणि सामाजिक समस्यांचा विचार करून खालील तरतुदी करण्यात आल्या आहेत.

अ. सीआरझेड-I विभाग

- सर्व मान्यताप्राप्त रस्ते प्रवाहाने वाहून आणलेल्या गाळाने तयार झालेल्या जमिनीवर बांधण्यात आले पाहिजेत, जेणेकरून प्रवाहात अडथळा येणार नाही.
- रस्त्यांच्या निर्मितीसाठी तोडल्या जाणाऱ्या/ नष्ट होणाऱ्या जलपर्णींच्या पाचपट जलपर्णींची फेरलागवड करण्यात यावी.
- अधिसूचना जारी झाल्यापासून एक वर्षाच्या आत जलपर्णींच्या क्षेत्रांचे नकाशे तयार करणे, ती क्षेत्रे अधिसूचित करणे आणि त्यांच्या संवर्धनासाठी उपाय योजणे बंधनकारक आहे. घनकचरा साठवणुकीच्या जागा सीआरझेड क्षेत्राबाहेर हलविण्यात आल्या पाहिजेत आणि

धोकारेषेपासून समुद्राच्या बाजूला असणाऱ्या वसतिस्थानांच्या आणि घरांच्या संरक्षणासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला पाहिजे.

ब. सीआरझेड-II विभाग

- चटईक्षेत्र निर्देशांक आणि चटईक्षेत्र गुणोत्तराबाबत स्थानिक शहरी किंवा ग्रामीण नियोजन नियमावलीत असणाऱ्या नियमांचे (प्रकल्प मंजूर करतेवेळी अस्तित्वात असलेल्या) अनुपालन करून राज्य शासन सीआरझेड- II विभागात झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प हाती घेऊ शकेल; मात्र राज्य शासन किंवा शासकीय संस्थांचे अशा प्रकल्पातील भागभांडवल ५१ टक्क्यांपेक्षा कमी असता कामा नये.

- सीआरझेड-II क्षेत्रातील जुन्या, मोडकळीस आलेल्या इमारतींची फेरबांधणी करण्यास परवानगी असेल. संबंधित इमारतींच्या मालकांनी स्वतः किंवा खासगी विकसकांमार्फत असे प्रकल्प हाती घेतले पाहिजेत. असे सर्व प्रकल्प सक्षम यंत्रणेकडून मंजूर होतेवेळी अस्तित्वात असणाऱ्या स्थानिक शहरी किंवा ग्रामीण नियोजन नियमावलीशी सुसंगत असले पाहिजेत.

- बृहन्मुंबईतील हिरवाईची क्षेत्रे संवर्धित होण्याच्या दृष्टीने सीआरझेड-II मध्ये वर्गीकृत करण्यात आलेल्या सर्व खुल्या जागा, बगीचे, उद्याने, क्रीडांगणे यांचे वर्गीकरण सीआरझेड-III मध्ये केले जाईल, जे 'ना-विकास क्षेत्र' असेल. चटईक्षेत्र निर्देशांक १५ टक्के असेल, तरच अशा क्षेत्रात केवळ सार्वजनिक सोयीसुविधांसाठी बांधकामांना परवानगी दिली जाईल. अशा जागांचा रहिवासी किंवा व्यावसायिक कारणांसाठी वापर करणे प्रतिबंधित करण्यात आले आहे.

- सीआरझेड-II विभागातील स्थानिक रहिवाशांच्या घरकुलांची दुरुस्ती आणि फेरबांधणी यांना सक्षम अधिकाऱ्यांकडून प्राधान्यतत्त्वावर परवानगी दिली जाईल.

- १९८१ च्या विकास आराखड्यात नमूद केलेले किंवा महाराष्ट्र शासनाच्या अन्य नोंदींनुसार अस्तित्वात असणारे कोळीवाडे आणि मच्छिमारांची घरकुले नकाशाबद्ध करून त्यांना सीआरझेड-III चा दर्जा देण्यात येईल, जेणेकरून स्थानिक शहर आणि ग्रामीण नियोजन नियमावलीनुसार या घरकुलांची दुरुस्ती आणि फेरबांधणी शक्य होईल.

३. बृहन्मुंबईला देण्यात आलेल्या विशेष सवलतींचा वापर होताना गैरप्रकार होणार नाहीत, याची हमी देण्यासाठी कोणती यंत्रणा तयार करण्यात आली आहे?

मुंबईतील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन आणि धोकादायक इमारतींची पुनर्बांधणी ही कामे अत्यंत जबाबदारीने आणि पारदर्शकतेने होत आहेत, हे तपासण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

- सक्षम अधिकाऱ्यांकडून मान्यता मिळालेल्या सर्व पुनर्वसन आणि पुनर्बांधणी प्रकल्पांना माहितीचा अधिकार कायदा २००५ लागू करण्यात आला आहे.
- झोपडपट्टी पुनर्वसनासंबंधीच्या प्रकल्पांचे लेखापरीक्षण भारताच्या महालेखापाल कार्यालयाकडून करण्यात येईल, तसेच मोडकळीस आलेल्या, कोसळलेल्या आणि धोकादायक इमारतींच्या पुनर्बांधणी प्रकल्पांच्या बाबतीत महालेखापाल कार्यालयातील पॅनेलवर असलेल्या वैधानिक लेखापरीक्षकाकडून ते केले जाईल.
- महाराष्ट्र शासनातर्फे नियमित पाहणीसाठी उच्चस्तरीय देखरेख समितीची स्थापना करण्यात येईल. या समितीत स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या प्रतिनिधींसह वास्तुविशारद, नगररचनाकार, अभियंते आणि लोकप्रतिनिधींचा समावेश असेल.

४.केरळसाठी कोणत्या विशेष सवलती दिल्या जातील?

केरळला अत्यंत दुर्मिळ असे किनारी पर्यावरण लाभले असून, खाड्यांच्या क्षेत्रात तीनशेहून अधिक बेटे या राज्यात आहेत. केरळचा आगळावेगळा भौगोलिक आराखडा विचारात घेऊन अधिसूचनेत केरळच्या किनारपट्टीसाठी विशेष सवलती देऊ करण्यात आल्या आहेत.

केरळमधील खाडीक्षेत्रात असलेली बेटे आकाराने चिंचोळी असल्यामुळे सीआरझेड क्षेत्र भरतीरेषेपासून जमिनीच्या दिशेने ५० मीटरपर्यंत घटविण्यात आले आहे. हे ना-विकास क्षेत्र असेल आणि तेथे नवीन बांधकामे करण्यास परवानगी नसेल. तथापि, स्थानिक रहिवाशांच्या घरकुलांची दुरुस्ती आणि फेरबांधणी करता येईल. मासेमारीचे धक्के, मासे वाळविण्याच्या जागा, जाळी विणण्याची ठिकाणे, पारंपरिक पद्धतीने मत्स्यप्रक्रिया करणारी केंद्रे, नौकाबांधणीची क्षेत्रे, बर्फाचे कारखाने, नौकादुरुस्तीची ठिकाणे आदी किनारी सुविधांसाठीही शून्य ते ५० मीटरदरम्यान बांधकाम करता येईल. भरतीरेषेपासून ५० मीटरच्या बाहेरील क्षेत्रात स्थानिक रहिवाशांची घरकुले स्थानिक ग्रामपंचायतींच्या परवानगीने बांधता येतील.

५.सुंदरबन आणि पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील अशा अन्य विभागांना कोणत्या खास सवलती देण्यात आल्या आहेत?

सुंदरबन हे देशातील सर्वांत मोठे जलपर्णीचे क्षेत्र आहे. या क्षेत्रात सुमारे पाच लाख लोक राहतात. समुद्राच्या पातळीतील वाढ, तसेच वातावरणातील बदलांमुळे बदलणारे जलप्रवाह यांमुळे सुंदरबन सर्वाधिक बाधित आहे. त्याचप्रमाणे पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे स्थानिक लोकांना मोठ्या अडचणींचा मुकाबला करावा लागतो. सुंदरबनसह खंबाटचे आखात, कच्छचे आखात, महाराष्ट्रातील मालवण आणि आजरा, कर्नाटकातील कारवार आणि कुंडापूर, केरळमधील वेम्बनाद, ओरिसातील भैतरकणिका, आंध्र प्रदेशातील कोरिंगा, पूर्व गोदावरी आणि कृष्णा यांसारख्या पर्यावरणीयदृष्ट्या अतिसंवेदनशील असणाऱ्या विभागांसाठी सर्वंकष विकास आराखडा तयार करणे प्रस्तावित आहे. हे विभाग अत्यंत धोकाप्रवण (सीव्हीसीए) म्हणून घोषित केले जातील आणि स्थानिक रहिवाशांशी सल्लामसलत करून यातील प्रत्येक विभागासाठी सर्वसमावेशक व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात येईल. जोपर्यंत सर्वसमावेशक व्यवस्थापन आराखडा तयार होऊन त्याची अमलबजावणी होत नाही, तोपर्यंत स्थानिक रहिवाशांच्या विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधांची उभारणी करण्यासाठी प्रत्येक प्रकरणाचा स्वतंत्ररीत्या विचार करून किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाकडून प्रत्येक प्रकरणाला संमती दिली जाईल.

६. गोव्यासाठी कोणत्या विशेष सवलती देण्यात आल्या आहेत?

शाश्वत विकास आणि किनारी पर्यावरणाच्या संरक्षणाचा विचार करून नियमनाची कडक यंत्रणा तयार करण्याबरोबरच गोवा राज्याला काही विशेष सवलती देण्यात आल्या आहेत. त्या तरतुदी पुढीलप्रमाणे :

- गोव्याच्या किनारपट्टीवरील गावांमधील लोकांचा पारंपरिक व्यवसाय मच्छिमारी आणि तदनुषंगिक व्यवसाय हाच असल्याने त्यांना त्यांच्या उपजीविकेसाठी पायाभूत सुविधा पुरविण्यात आल्या पाहिजेत आणि सर्वसमावेशक सर्वेक्षण करून गोवा सरकार त्या सुविधा पुरवेल.
- सीआरझेड क्षेत्रात स्थानिक जनसमूहांच्या घरकुलांच्या दुरुस्तीस आणि फेरबांधणीस परवानगी असेल.

- खझान या नावाने ओळखल्या जाणाऱ्या, लाटांच्या प्रवाहामुळे प्रभावित होणाऱ्या पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील अशा सखल प्रदेशांचे नकाशे तयार करण्यात येतील. अशा प्रदेशांमधील जलपर्णींचे जतन केले जाईल आणि व्यवस्थापन आराखडा तयार केला जाईल. खझान प्रदेशात कोणत्याही प्रकारचे विकासकाम करता येणार नाही.
- खाड्या आणि उपसागरालगतच्या वाळूच्या टेकड्या, पुळणी आदींचे सर्वेक्षण करून नकाशे तयार केले जातील. वाळूच्या टेकड्या असलेल्या अशा विभागांमध्ये विकासकामांना बंदी असेल.
- मांद्रेम, मॉर्जिम, गालगिबा आणि आगोंदा यांसारखे समुद्रकिनारे ही कासवांची विणीची ठिकाणे म्हणून ओळखली जातात. हे किनारे वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ अंतर्गत संरक्षित केले जातील. या किनाऱ्यांचे सर्वेक्षण करून ही ठिकाणे संरक्षित करण्याच्या दृष्टीने व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात येईल. या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या विकासकामांना मनाई असेल.

VIII. प्रलंबित प्रकरणांचे हस्तांतरण आणि १९९१ च्या अधिसूचनेचा भंग करणारी प्रकरणे

१. २०११ ची अधिसूचना जारी होणे, याचा अर्थ सीआरझेड अधिसूचना १९९१ चा भंग करण्याच्या प्रकरणांमधून संबंधितांना सूट मिळणे असा होतो का?

नाही. केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाकडून प्राप्त होणाऱ्या विशिष्ट निर्देशांनुसार, पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ च्या कलम ५ अन्वये सर्व किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणांना विशिष्ट मार्गदर्शक सूचना दिल्या जातील आणि ताजे नकाशे, उपग्रहावरून घेतलेली छायाचित्रे आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून या प्रकरणांमध्ये ठराविक कालमर्यादेत कारवाई करण्यात येईल.

२. २०११ ची अधिसूचना जारी झाल्यानंतर १९९१ च्या अधिसूचनेअंतर्गत तयार करण्यात आलेल्या किनारी क्षेत्र व्यवस्थापन आराखड्यांची स्थिती काय असेल?

सीआरझेड अधिसूचना २०११ अंतर्गत नवे किनारी क्षेत्र व्यवस्थापन आराखडे मंजूर होईपर्यंत किनारी नियंत्रण क्षेत्र अधिसूचना १९९१ अंतर्गत तयार करण्यात आलेल्या किनारी क्षेत्र व्यवस्थापन आराखड्यांचे पालन केले जाईल, अशी तरतूद या अधिसूचनेत करण्यात आली आहे.

३. सीआरझेड १९९१ चे उल्लंघन करून उभारण्यात आलेली 'आदर्श'सारखी बांधकामे २०११ च्या अधिसूचनेनुसार नियमित करण्यात येतील का?

नाही. केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाकडून प्राप्त होणाऱ्या विशिष्ट निर्देशांनुसार, पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ च्या कलम ५ अन्वये सर्व किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणांना विशिष्ट मार्गदर्शक सूचना दिल्या जातील आणि ताजे नकाशे, उपग्रहावरून घेतलेली छायाचित्रे आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून या प्रकरणांमध्ये ठराविक कालमर्यादेत कारवाई करण्यात येईल.

IX. द्वीपक्षेत्र संरक्षण (आयपीझेड) अधिसूचना

१. स्वतंत्र द्वीपक्षेत्र संरक्षण अधिसूचनेची गरज का आहे?

अंदमान आणि निकोबार द्वीपकल्पात सुमारे ५०० लहानमोठी बेटे असून लक्षद्वीपमध्ये ३० बेटे आहेत. हे दोन द्वीपसमूह म्हणजे देशातील अत्यंत समृद्ध अशा जैवविविधतेचे माहेरघर आहे. अंदमान आणि निकोबार द्वीपकल्प हा सागरी जैवविविधता आणि भूजैवविविधतेसाठी सुप्रसिद्ध असून अंदमान आणि निकोबारच्या क्षेत्रफळापैकी ८५ टक्के जमीन जंगलांनी व्यापलेली आहे. लक्षद्वीप हा प्रवाळांचा द्वीपकल्प आहे. यातील अनेक बेटे भौगोलिकदृष्ट्या इतकी लहान आहेत की ५० मीटरच्या सागरी नियंत्रण क्षेत्राची मर्यादा पाळणेही अवघड आहे. त्यामुळे या बेटांसाठी स्वतंत्र अधिसूचना जारी करण्यात आली असून त्यात (उत्तर अंदमान, मध्य अंदमान, दक्षिण अंदमान आणि ग्रेट निकोबार ही चार बेटे वगळता) सर्व द्वीपकल्पाचा समावेश करण्यात आला आहे.

२. आयपीझेड अधिसूचना २०११ ची उद्दिष्टे कोणती?

द्वीपकल्प संरक्षण अधिसूचना २०११ ची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे

- किनारी प्रदेशात वास्तव्यास असलेले स्थानिक मच्छिमार, आदिवासी आणि अन्य स्थानिक जनसमुदायांना उपजीविकेची सुरक्षा प्रदान करणे;
- किनारपट्ट्यांचे संरक्षण आणि संवर्धन करणे;

- किनारी क्षेत्रातील नैसर्गिक धोके आणि जागतिक तापमानवाढीमुळे वाढणारी समुद्रपातळी यांचा विचार करून शास्त्रीय तत्त्वांच्या आधारे किनारी क्षेत्रात शाश्वत विकासास प्रोत्साहन देणे.

३. आयपीझेड २०११ अधिसूचनेची न्यायिक कक्षा कोणती?

उत्तर अंदमान, मध्य अंदमान, दक्षिण अंदमान आणि ग्रेट निकोबार या चार बेटांच्या बाबतीत समुद्रमुखाजवळचे भरतीरेषेपासून ५०० मीटरचे क्षेत्र या अधिसूचनेच्या कक्षेत येते. अंदमान आणि निकोबार तसेच लक्षद्वीप द्वीपकल्पातील उर्वरित सर्व बेटांच्या बाबतीत संपूर्ण भूप्रदेश आणि किनाऱ्यांपासूनचे १२ सागरी किलोमीटरचे सागरी अंतर या अधिसूचनेच्या कक्षेत येते.

४. या बेटांचे व्यवस्थापन करताना तेथील नैसर्गिक आपत्तींची वारंवारिता विचारात घेतली आहे का?

होय. अंदमान आणि निकोबार द्वीपसमूहाचा परिसर भूकंप, त्सुनामी आणि चक्रीवादळप्रवण आहे. एकात्मिक द्वीपक्षेत्र व्यवस्थापन आराखड्यात नैसर्गिक आपत्ती आणि अन्य पर्यावरणविषयक मुद्द्यांचा अंतर्भाव करण्यात येणार आहे. एकात्मिक द्वीपक्षेत्र व्यवस्थापन आराखडा तयार करण्यासाठी योग्य मार्गदर्शक तत्त्वे अधिसूचनेत नमूद करण्यात आली आहेत.

X. गोषवारा : किनारी क्षेत्र नियंत्रण अधिसूचना २०११ आणि किनारी नियंत्रण क्षेत्र अधिसूचना १९९१ यांचा तौलनिक विचार

१. किनारी क्षेत्र नियंत्रण अधिसूचना २०११ मधील महत्त्वाच्या अशा नव्या विशिष्ट तरतुदी कोणत्या?

(i) समुद्रातील १२ सागरी मैल अंतराचा जलप्रदेश आणि नद्या, खाड्या, नदीमुख अशा सर्व भरतीप्रभावित जलसंस्थांचे नियमन या अधिसूचनेअंतर्गत करण्यात येईल.

(ii) किनारी क्षेत्रातील पायाभूत सुविधांसह स्थानिक जनसमूहांना उपजीविकेची आणि मालमत्तेच्या सुरक्षेची हमी देण्याच्या दृष्टीने धोकारेषेची योजना करण्यात आली असून, सर्व्हे अफ इंडियाचे अधिकारी या रेषेचे आरेखन करतील.

(iii) पर्यावरणविषयक आणि सामाजिक समस्या विचारात घेऊन बृहन्मुंबई, केरळ गोवा आणि सुंदरबनसारख्या संवेदनशील आणि धोक्यात असलेल्या किनारी प्रदेशांना विशेष सवलती देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

(iv) मानवी हस्तक्षेपामुळे किनारी प्रदेशात होणारी जमिनीची धूप विचारात घेऊन उपग्रहावरून प्राप्त झालेल्या ताज्या छायाचित्रांच्या आधारे किनारारेषा नकाशाबद्ध करण्यात येणार आहे आणि ‘अतिधूप असलेले’, ‘मध्यम धूप असलेले’ आणि ‘कमी धूप असलेले किंवा स्थिर किनारे’ असे किनारपट्ट्यांचे वर्गीकरण केले जाणार आहे. अतिधूप असलेल्या प्रदेशांमध्ये विकासकामांना परवानगी दिली जाणार नाही.

(v) किनारपट्टीवरील मच्छिमार जनसमुदाय आणि अन्य पारंपरिक रहिवाशांची घरांची वाढती गरज पूर्ण करण्याच्या दृष्टीने ना-विकास क्षेत्र भरतीरेषेपासून २०० मीटरऐवजी १०० मीटरपर्यंत घटविण्यात आले आहे.

२. किनारी नियंत्रण क्षेत्र अधिसूचना १९९१ मधील कोणत्या तरतुदी किनारी नियंत्रण अधिसूचना २०११ मध्ये कायम ठेवण्यात आल्या आहेत?

(i) अधिसूचना लागू होण्याचे क्षेत्र समुद्रमुखाच्या बाबतीत भरतीरेषेपासून ५०० मीटर आणि भरतीप्रभावित जलसंस्थांच्या बाबतीत भरतीरेषेपासून १०० मीटरपर्यंत कायम ठेवण्यात आले आहे.

(ii) सीआरझेड-I (पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील विक्षाग), सीआरझेड-II (शहरी क्षेत्र), सीआरझेड-III (ग्रामीण क्षेत्र) असे किनारी नियंत्रण क्षेत्राचे वर्गीकरण कायम ठेवण्यात आले आहे.

(iii) किनारी नियंत्रण क्षेत्र I,II, आणि III यांची आखणी करून किनारी क्षेत्र व्यवस्थापन आराखडा तयार करण्याची कार्यप्रणाली कायम ठेवण्यात आली आहे.

३. किनारी नियंत्रण क्षेत्र अधिसूचना १९९१ मधील कोणत्या महत्त्वाच्या तरतुदी किनारी नियंत्रण क्षेत्र अधिसूचना २०११ मधून वगळण्यात आल्या आहेत?

(i) विशेष आर्थिक क्षेत्रांतर्गत कोणत्याही प्रकल्पांना यापुढे किनारी नियंत्रण क्षेत्रात परवानगी मिळणार नाही.

(ii) अंदमान आणि निकोबार, तसेच लक्षद्वीप बेटांवरील विशिष्ट भौगोलिक मुद्दे आणि पर्यावरणीय संवेदनशीलता विचारात घेऊन, तसेच बेटवासीयांच्या गरजा लक्षात घेऊन या द्वीपकल्पांशी संबंधित तरतुदी अधिसूचनेतून वगळण्यात आल्या असून, या द्वीपकल्पांसाठी स्वतंत्र अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

(iii) किनारी नियंत्रण क्षेत्र-III मधील ग्रामीण जनसमूहांच्या घरबांधणीवर निर्बंध घालणाऱ्या तरतुदी वगळण्यात आल्या आहेत.